महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ १२८ /२०२३ दि. ४/०९/२०२३

**"वाहतूक नियंत्रण अधिसुचना"**

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वागळे वाहतूक उपविभागाचे हद्दीत उपवन तलाव, आईमाता मंदिर ते ठाकूर कॉलेज, आईमाता मंदिर ते डवलेनगर, ग्रीन रोड परिसरात वाहनांची मोठया प्रमाणात वाढ होत आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील ठिकाणी **नो पार्किंग, पी १ व पी २ पार्किंग, जड माल वाहतुकीस प्रवेश बंद व्यवस्था** होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**१) नो पार्किंग व्यवस्था करण्यात आलेले ठिकाण :–**

| अ.क्र. | ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | पायलादेवी मंदिर ते ॲम्पी थिएटर हॉल पर्यत तलावाचे बाजूस | नो पार्किंग | ६०० मीटर | २४ तास |

**२) पी–१ व पी–२ पार्किंग व्यवस्था करण्यात आलेले ठिकाण :–**

| अ.क्र. | ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | नेत्रम हॉस्पिटल ते महात्मा फुले नगर | पी–१, पी–२ | ३०० मीटर | २४ तास |
| २ | विजया अपार्टमेंट ते ठाकूर कॉलेज | पी–१, पी–२ | ३५० मीटर | २४ तास |
| ३ | आईमाता मंदिराचे उजवे बाजू ते यशोधन नगर | पी–१, पी–२ | २५० मीटर | २४ तास |
| ४ | यशोधन नगर ते डवले नगर | पी–१, पी–२ | २५० मीटर | २४ तास |

**३) जड माल वाहतुकीस प्रवेश बंद करण्यात आलेले ठिकाण :–**

| अ.क्र. | ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रीन रोड ते जुना पासपोर्ट ऑफिस | प्रवेश बंद | ४०० मीटर | २४ तास |

सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन १५ दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, ठाणे, ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

**प्रत कार्यवाहीकरीता :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. ठाणेनगर, नौपाडा, कोपरी वाहतूक उप विभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावी.

CamScanner